सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग**
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/३३६२०/२०२० 11522 दिनांक :-२१/१०/२०२०

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 1377.
दिनांक - 11/11/2020.
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**विषय :- कांदळवन वेबसाईटवर प्राप्त तक्रारीबाबत.**
**Uran Mangroves Zone turns into massive garbage dumping ground.**
**अर्जदार श्री.नंदकुमार पवार व श्री.बी.एन.कुमार**

**संदर्भ :- आपल्या कार्यालयाकडील ई-मेल व्दारे प्राप्त तक्रार क्र.१०२/५८.**

श्री.नंदकुमार पवार व श्री.बी.एन.कुमार यांनी कांदळवन ऱ्हास होत असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडून या कार्यालयाकडील पत्र दि.०३/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी तहसिलदार उरण यांचेमार्फत चौकशी करुन दिनांक २१/१/२०२० व दिनांक २५/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

श्री.नंदकुमार पवार व इतर यांनी उरण नगरपरिषदेला कचरा डेपोसाठी दिलेली जागा मौजे बोरीपाखाडी स.नं.१८०/१अ/१ येथे उरण नगरपरिषदेमार्फत कचरा जात असल्यामुळे कचऱ्याखाली कांदळवनाची झाडे गाडली जात असल्याबाबतची तक्रार दि.२८/१२/२०१९ रोजी कांदळवन कक्षाकडे ई-मेल व्दारे सादर केली आहे. सदर तक्रारीबाबत अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या ठिकाणची यापूर्वीच दि.१३/१२/२०१९ महसूल नायब तहसिलदार उरण, परिक्षेत्र वन अधिकारी उरण, सहाय्यक कार्यकारी अभियंता सिडको, मंडळ अधिकारी उरण व तक्रारदार श्री.बी.एन.कुमार व श्री.नंदकुमार पवार यांचेसमवेत संयुक्त स्थळपाहणी करण्यांत आली आहे.

अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या ठिकाणची अर्जदारांसमवेत पाहणी केली असता, मौजे बोरीपाखाडी येथील स.नं.१८०/१/अ/१ या जागेचा वापर उरण नगरपरिषद कचरा टाकण्यासाठी करत आहे. परंतु स्थळपाहणीच्या वेळी मौजे बोरीपाखाडी स.नं.१८०/१अ/१ येथे कचऱ्याच्या ढिगाच्या लगतचे कांदळवन कचऱ्याखाली गाडले जात असल्याचे आढळून आले आहे.

त्यामुळे मौजे बोरीपाखाडी स.नं.१८०/१अ/१ येथे कचऱ्याच्या ढिगाच्या लगतचे कांदळवन कचऱ्याखाली गाडले जात असल्यामुळे उरण नगरपरिषद यांचेवर पोलीस स्टेशन उरण येथे FIR NO. ००१८/२०२० दिनांक १९/१/२०२० वेळ १५.२७ वाजता गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालानुसार वस्तुस्थिती बाबत अहवाल व तहसिलदार उरण, मंडळ अधिकारी उरण यांचेकडील अहवाल, जबाब, पंचनामा व FIR No. ००१८/२०२० प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.

(विशाल दौंडकर)
**तहसिलदार (महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय रायगड**

Steno
Uran dumping site
Mangrove committee file
DCF(M)
13/11